# विकास साधणारा सेतू

## ब्रह्मपुत्रा नदीवरील ढोला-सादिया पुलाचे उद्घाटन



**पीटीआय, सादिया**

**आसाममधील लोहित** नदीवरचा देशातील सर्वात लांब पुलाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केले. देश महासत्ता होऊन आर्थिक क्रांतीची मूहूर्तमेढ रोवण्यासाठी हा पूल म्हणजे पाया आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. एकूण ९.१५ कि.मी. लांबीचा हा पूल असून तो मोदी यांनी देशाला अर्पण केला. हा पूल आसाम व अरुणाचल प्रदेश यांना जवळ आणणारा आहे.

तो बांद्रा वरळी सी लिंकपेक्षा ३.५५ कि.मी.ने मोठा आहे. या पुलाला भूपेन हजारिका यांचे नाव देण्याचेही त्यांनी जाहीर केले कारण हजारिका हे सादियाचे रहिवासी होते. मोदी यांनी सरकारच्या तिसऱ्या स्थापनादिनानिमित्त हा पूल देशास अर्पण करताना सांगितले की, हा पूल केवळ पैसेच वाचवणार नाही तर प्रवासाचा वेळ कमी करणार आहे. त्यामुळे नव्या आर्थिक क्रांतीची बीजे रोवली गेली आहेत त्यामुळे देशाचे डोळे या पुलाकडे आहेत. या पुलामुळे अंतर १६५ कि.मी.ने कमी झाले असून प्रवासाचा वेळ ७-८ तास कमी झाला आहे. त्यामुळे आर्थिक विकासाची दारे खुली होतील. पुलासाठी २०५६ कोटी रुपये खर्च आला असून तो बांद्रा वरळी सी लिंकपेक्षा ३.५५ कि.मी.ने मोठा आहे. या पुलामुळे आसाम व अरुणाचल प्रदेशाचा विकास होईल व देश महाशक्ती होण्याचे स्वप्न साकारले जाईल त्याची सुरुवात ईशान्येकडून होत आहे. जर शाश्वत विकास करायचा असेल तर पायाभूत सुविधा महत्त्वाच्या आहेत, असे मोदी म्हणाले.

### पुलाची वैशिष्ट्ये...

- लांबी : ९.१५ किमी
- वांद्रे-वरळी सागरी सेतूपेक्षा ३.५५ किमीने जास्त लांब
- खर्च : दोन हजार कोटी रुपये
- आसाम-अरुणाचलमधील अंतर १६५ किमीने कमी
- हा प्रवास सात ते आठ तासांनी कमी होणार
- अरुणाचल प्रदेशला लागून असलेल्या सीमाभागात लष्कराला तातडीने रसद पुरवण्यासाठी उपयुक्त
- दळणवळणात महत्त्व
- ईशान्येकडील उत्तम प्रतीच्या आल्याला नवी बाजारपेठ मिळेल

# सुखोई विमानाचा सांगाडा सापडला

## दोन्ही वैमानिक बेपत्ताच

**पीटीआय, नवी दिल्ली**

**भारतीय हवाई** दलाचे आसाममधील तेजपूर येथून दोन वैमानिकांसह बेपत्ता झालेले सुखोई हे लढाऊ जेट विमान आसाम-अरुणाचल सीमेवर सापडले आहे ते २३ मे रोजी बेपत्ता झाले होते. खराब हवामानामुळे विमानाचा शोध घेण्यात अनेक अडचणी आल्या असून दोन वैमानिकांबाबत अजून काही समजलेले नाही, असे लेफ्टनंट कर्नल सोंबित घोष यांनी सांगितले.

या विमानाचा संपर्क ज्या ठिकाणी असताना तुटला होता तेथेच म्हणजे तेजपूरच्या उत्तरेला ६० कि.मी. अंतरावर ते सापडले आहे.. सुखोई ३० एमकेआय जेट विमान आसाममध्ये तेजपूरच्या उत्तरेला ६० कि.मी. अंतरावर चीन सीमेजनीक बेपत्ता झाले होते. सुखोई विमान स्क्वार्डन लिडर चालवत होते व समवेत फ्लाइट लेफ्टनंटही होता. २३ मे रोजी सकाळी साडेदहा वाजता या विमानाने नेहमीप्रमाणे सरावासाठी उड्डाण केले.

भारतीय हवाई दलाने आतापर्यंत २४० पैकी ७ सुखोई ३० एमकेआय लढाऊ विमाने अशा दुर्घटनात गमावली आहेत. भारताने दोन आसनी २७२ सुखोई विमाने रशियाकडून १२ अब्ज डॉलर्सला घेतली होती व त्यांचे उत्पादन रशियाच्या परवानगीने हिंदुस्थान अरोनॉटिक्स येथे करण्यात आले होते. २०११ पासून लष्कराने एकूण साठ विमाने व हेलिकॉप्टर्स गमावली असून त्यात ८० जण मरण पावले आहेत.

गेल्या वर्षी आसाममध्ये नागाव येथे सुखोई ३० एमकेआय विमान नेहमीच्या सराव उड्डाणात कोसळले होते त्यावेळी दोन वैमानिक सुखरूप बचावले होते, त्यावेळी काही स्थानिक लोक जखमी झाले होते.



### चौकशीचे आदेश

सुखोई विमान पडून झालेल्या अपघाताची चौकशी करण्याचे आदेश भारतीय हवाई दलाने दिले आहेत. हवाईदलाचे प्रवक्ते विंग कमांडर अनुपम बॅनर्जी यांनी सांगितले की, या अपघाताची कारणे शोधण्यासाठी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. जिथे विमान पडले तो दुर्गम भाग असून विमानाचा सांगाडा दिसला असला तरी तो आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. एक पथक तेथे गेल्यानंतर फ्लाइट डाटा रेकॉर्डर व दोन बेपत्ता वैमानिकांचा शोध घेतला जाईल. ट्रेकिंगच्या माध्यमातून लष्कराचे पथक तेथे पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहे, पण खराब हवामानामुळे त्यात अडथळे येत असल्याचे बॅनर्जी यांनी सांगितले.

# एम ७७७ तोफा चाचणीसाठी पोखरणमध्ये दाखल

**पीटीआय, जयपूर**

**अमेरिकेकडून विकत** घेण्यात आलेल्या एम ७७७ प्रकारच्या पहिल्या दोन तोफा भारताला मिळाल्या असून त्या राजस्थानमधील पोखरण येथे चाचण्यांसाठी दाखल झाल्या आहेत. १९८०च्या दशकात घेण्यात आलेल्या बोफोर्स तोफांनंतर भारतीय लष्करात प्रथमच नव्या तोफा दाखल होत आहेत.

एम ७७७ या हलक्या वजनाच्या हॉवित्झर प्रकारच्या तोफा असून अशा १४५ तोफा खरेदी करण्याचा सुमारे ५००० कोटी रुपयांचा करार गतवर्षी नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेच्या बीएई सिस्टीम्स या कंपनीशी करण्यात आला होता. या तोफा पाकिस्तान व चीन सीमेवरील पर्वतमय प्रदेशात अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. त्या हेलिकॉप्टरला खाली दोरीने बांधूनही वाहून नेता येतात. त्यांचा पल्ला २५ ते ४० किमी. आहे. त्यापैकी पहिल्या दोन तोफा गेल्या आठवड्यात भारतात दाखल झाल्या. त्यांचे पोखरण येथे पुढील दोन ते तीन महिने सखोल परीक्षण करण्यात येईल. त्यातून विविध प्रकारचे तोफगोळे डागून माहिती संकलित करून तिचे विश्लेषण करण्यात येईल. करारातील पुढील तोफा मार्च २०१९ पासून २०२१ सालापर्यंत दर महिन्याला पाच याप्रमाणे भारताला मिळतील. यापैकी पहिल्या २५ तोफा थेट अमेरिकेतून येतील. बाकीच्या तोफा करारानुसार भारतात महिंद्रा उद्योगसमूहातर्फे बनवण्यात येतील.




mep INFRASTRUCTURE DEVELOPERS LTD.

PAT Rs 109 Cr

EPS Rs 6.70

Declared Final Dividend of Re 0.15 per share

CIN: L45200MH2002PLC136779
Registered Office: A-412, boomerang, Chandivali Farm Road, Near Chandivali Studio, Andheri (East), Mumbai 400 072.
Ph: (91 22) 61204800; Fax: (91 22) 6120 4804; Email: investorrelations@mepinfra.com; Website: www.mepinfra.com

EXTRACT OF CONSOLIDATED AUDITED RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED MARCH 31, 2017

(Rs. In Lakhs ,except EPS data)

| S.No. | Particulars | Quarter Ended March 31, 2017 | Year to date figures for the Year Ended March 31, 2017 | Quarter Ended March 31, 2016 |
|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations | 46,117.72 | 181,543.58 | 52,783.23 |
| 2 | Net profit /(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 1,490.15 | 1,405.66 | (1,204.66) |
| 3 | Net Profit /(Loss) for the period before tax (after Exceptional and/ or Extraordinary Items) | 1,490.15 | 17,199.01 | (1,204.66) |
| 4 | Net Profit /(Loss) for the period after tax (after Excetional and / or Extraordinary items) | 1,204.25 | 10,892.50 | (820.40) |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit /(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 1,176.23 | 10,844.33 | (824.28) |
| 6 | Equity Share Capital | 16,256.92 | 16,256.92 | 16,256.92 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | (27,501.37) |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 10 /- each) (for continuing and discontinued operations) - | | | |
| | Basic : | 0.74 | 6.70 | (0.50) |
| | Diluted: | 0.74 | 6.70 | (0.50) |

Note:
1 The above is an extract of the detailed format of quarterly Financial Results for the quarter ended and year ended March 31,2017 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing and other Disclosure Requirements) Regulation, 2015. The full format of the Quarterly Financial Results including the modified opinion are available on the Stock Exchange web sites- www.bseindia.com and www.nseindia.com and on the Company's website - www.mepinfra.com.
2 The above audited financial results were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on 25 May 2017. The Audit of financial results for the quarter and year ended 31st March 2017 has been carried out by the Statutory Auditors of the company.
3 The financial results have been prepared in accordance with Indian Accounting Standards (Ind AS) prescribed under Section 133 of the companies Act, 2013 read with releavnt rules thereunder and in terms of Regulation 33 of the SEBI Regulations and SEBI circular dated 5th July 2016.
4 **Key numbers of Standalone Financial Results** (Rs. In Lakhs)

| Particulars | Quarter Ended March 31, 2017 | Year to date figures for the Year Ended March 31, 2017 | Quarter Ended March 31, 2016 |
|---|---|---|---|
| Total income from operations | 23,054.52 | 81,000.00 | 20,704.88 |
| Net Profit /(Loss) before tax | 1,132.30 | 2,676.72 | 1,568.32 |
| Net Profit /(Loss) after tax before Other Comprehensive Income | 761.22 | 1,767.83 | 1,194.50 |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit /(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 741.40 | 1,741.18 | 1,195.93 |

5 Previous quarter/period's figures have been regrouped/rearranged wherever necessary.

For and on behalf of Board of Directors of
MEP INFRASTRUCTURE DEVELOPERS LIMITED
Sd/-
Jayant D. Mhaiskar
Vice Chairman & Managing Director
DIN: 00716351

Place : Mumbai
Date : 25 May 2017


# काश्मीरमध्ये दोन दहशतवादी ठार

## पाकच्या 'बॅट' हल्ल्याचा प्रयत्न उधळला

**पीटीआय, श्रीनगर**

**पाकिस्तानच्या सीमा** कृती पथकाने (बॉर्डर ॲक्शन टीम - बीएटी) काश्मीरच्या उरी क्षेत्रातील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर लष्कराच्या गस्ती पथकावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र तो भारतीय जवानांनी उधळून लावला. या वेळी झालेल्या धुमश्चक्रीत दोन दहशतवाद्यांना ठार करून भारतीय जवानांनी शहीद जवानांच्या मृतदेहांची विटंबना करण्याच्या पाकिस्तानच्या कृतीचा बदला घेतला.

उरी क्षेत्रात बीएटीच्या दहशतवाद्यांनी भारताच्या गस्ती पथकावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र दक्ष जवानांनी तो उधळून लावला आणि बीएटीच्या दोन दहशतवाद्यांना कंठस्नान घातले, असे लष्कराच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

भारतीय जवानांनी ज्या दोन दहशतवाद्यांना कंठस्नान घातले त्यांचे मृतदेह अद्यापही प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरच पडलेले आहेत, असे पोलीस सूत्रांनी सांगितले.

# भारतीय वंशाचे अमूल थापर अमेरिकेत न्यायाधीशपदी

**पीटीआय, वॉशिंग्टन**

**भारतीय वंशाचे** अमेरिकी नागरिक अमूल थापर यांच्या न्यायाधीशपदी नेमणुकीस सिनेटने मंजुरी दिली आहे. बरेच अधिकार असलेल्या अपील न्यायालयात ट्रम्प यांनी निवडलेले ते पहिले न्यायाधीश आहेत.

थापर यांची नेमणूक सहाव्या यूएस सर्किट कोर्ट ऑफ अपील्समध्ये न्यायाधीशपदी करावी, अशी शिफारस ट्रम्प यांनी केली होती; ती सिनेटने ५२ विरूद्ध ४४ मतांनी मंजूर केली आहे. त्यामुळे ४८ वर्षांचे थापर हे 'अमेरिकन सर्किट कोर्ट ऑफ अपील्स'मध्ये दुसरे दक्षिण आशियायी न्यायाधीश ठरले आहेत.

केंटुकी, टेनिसी, ओहिओ व मिशीगन येथील अपिलांची सुनावणी न्यायाधीश थापर यांच्याकडे असणार आहे. सहाव्या अपील न्यायालयात ते चांगली कामगिरी करतील यात शंका नाही, असे सिनेटचे नेते मिछ मॅकॉनेल यांनी काल सांगितले. थापर हे सध्या 'यूएस डिस्ट्रिक्ट कोर्ट ऑफ जज' आहेत. त्यांच्या नावाची शिफारस २१ मार्च रोजी ट्रम्प यांनी केली होती. केंटुकी येथे थापर यांनी दहा वर्षे काम केले आहे.

# ट्रम्प यांचा दुसरा मुस्लीमबंदी आदेशही न्यायालयाकडून स्थगित

**वॉशिंग्टन :** अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्थलांतरबंदीबाबत काढलेल्या दुसऱ्या सुधारित आदेशाला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. कनिष्ठ न्यायालयाचा निकालच अपिलीय न्यायालयात कायम करण्यात आला. ट्रम्प यांनी सुधारित आदेशात सहा देशातील मुस्लिमांना अमेरिकेत येण्यास बंदी केली होती. ट्रम्प प्रशासनाने आता या निकालावर सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचे ठरवले आहे.

यूएस सर्किट कोर्ट ऑफ अपील्स म्हणजे चौथ्या अपिलीय न्यायालयाने म्हटले आहे, की प्रशासनाच्या सुधारित आदेशात राष्ट्रीय सुरक्षेबाबत फारच संदिग्ध भाषा वापरली आहे. उलट यातून धार्मिक असहिष्णुता दिसून येते आहे. १० विरूद्ध ३ मतांनी अमेरिकी न्यायालयाने हा निकाल दिला असून या मुस्लीम बंदी आदेशाने राज्यघटनेचे उल्लंघन झाले असे म्हटले आहे. अपिलीय न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाचा निकाल उचलून धरला.

# इजिप्तमधील हल्ल्यात २६ ठार

**कैरो :** इजिप्तच्या दक्षिणेकडील भागात बुरखे घातलेल्या आणि लष्कराच्या गणवेशात आलेल्या बंदूकधाऱ्यांनी एका बसवर केलेल्या बेछूट गोळीबारात कॉप्टिक पंथाचे किमान २६ ख्रिश्चनधर्मीय ठार झाले असून त्यामध्ये बहुसंख्य मुलांचा समावेश आहे. तर अन्य २५ जण या गोळीबारात जखमी झाले आहेत.

गेल्या दोन महिन्यांत कॉप्टिक पंथाच्या ख्रिश्चनधर्मीयांवर करण्यात आलेला हा दुसरा मोठा हल्ला आहे. ही बस कैरोच्या दक्षिणेकडे असलेल्या अनबा सॅम्युअल मठाकडे जात असताना सदर हल्ला करण्यात आला. हल्लेखोर तीन वाहनांमधून आले होते.


AUDITED FINANCIAL RESULTS Q4 AND YEAR ENDED 2016-17

CG POWER AND INDUSTRIAL SOLUTIONS LIMITED
(Formerly Crompton Greaves Limited)
CIN: L99999MH1937PLC002641
Registered Office: 6th Floor, CG House, Dr. Annie Besant Road, Worli, Mumbai - 400 030
Tel No.: 022 - 24237777 Fax No.: 022-24237733
E-mail ID: investorservices@cgglobal.com Website: www.cgglobal.com

EXTRACT OF STANDALONE AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31ST MARCH, 2017

(₹ in crore)

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31.03.2017 Audited | Year ended 31.03.2017 Audited | Quarter ended 31.03.2016 Audited |
|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations - for continuing operations | 1284.49 | 4761.43 | 1205.29 |
| 2 | Net Profit for the period (before Tax and Exceptional items) (for continuing and discontinued operations) | 35.62 | 223.56 | 107.70 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional items) (for continuing and discontinued operations) | (22.26) | 123.76 | (1318.31) |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional items) (for continuing and discontinued operations) | (12.17) | 124.46 | (1324.12) |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (8.78) | 71.24 | (1357.00) |
| 6 | Equity Share Capital | 125.35 | 125.35 | 125.35 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in Audited Balance Sheet | 4073.94 | 4073.94 | 4002.70 |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 2 each) (for continuing and discontinued operations) | | | |
| | a) Basic | (0.19) | 1.99 | (21.13) |
| | b) Diluted | (0.19) | 1.99 | (21.13) |

EXTRACT OF CONSOLIDATED AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31ST MARCH, 2017

(₹ in crore)

| Sr No. | Particulars | Quarter ended 31.03.2017 Audited | Year ended 31.03.2017 Audited | Quarter ended 31.03.2016 Audited |
|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations - for continuing operations | 1710.06 | 6119.75 | 1850.67 |
| 2 | Net Loss for the period (before Tax, Exceptional Items, Share of Associates, Joint Venture and Minority Interest) (for continuing and discontinued operations) | (382.18) | (410.58) | (81.20) |
| 3 | Net Loss for the period before tax (after Exceptional Items, Share of Associates, Joint Venture and Minority Interest) (for continuing and discontinued operations) | (452.16) | (485.11) | (42.43) |
| 4 | Net Loss for the period after tax (after Exceptional Items, Share of Associates, Joint Venture and Minority Interest) (for continuing and discontinued operations) | (444.01) | (490.86) | (93.47) |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Loss for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (469.21) | (487.33) | (102.43) |
| 6 | Equity Share Capital | 125.35 | 125.35 | 125.35 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in Audited Balance Sheet | 3985.74 | 3985.74 | 4471.81 |
| 8 | Earnings Per Share (of ₹ 2 each) (for continuing and discontinued operations) | | | |
| | a) Basic | (7.08) | (7.83) | (1.49) |
| | b) Diluted | (7.08) | (7.83) | (1.49) |

Notes:
1. The above is an extract of the detailed format of Quarterly / Year ended Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly / Year ended Financial Results are available on the websites of the Stock Exchanges (www.bseindia.com and www.nseindia.com) and Company's website (www.cgglobal.com)
2. The above audited standalone and consolidated results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at its meeting held on 26th May, 2017.

For **CG Power and Industrial Solutions Limited**

AVANTHA GROUP COMPANY

K.N. Neelkant
CEO & Managing Director
DIN: 05122610

Place: New Delhi
Date : 26th May, 2017



महानगर गॅस लिमिटेड
(गेल, महाराष्ट्र शासन आणि बीजीएपीएच चा उपक्रम)
नोंदणीकृत कार्यालय: एमजीएल हाऊस, ब्लॉक जी-३३, वान्द्रे-कुर्ला संकुल, वान्द्रे (पूर्व), मुंबई ४०००५१ • सीआयएन: एल४०२००एमएच१९९५पीएलसी०८८१३३
दूरध्वनी: +९१ २२ ६६७८ ५००० • फॅक्स: +९१ २२ २६५२ ८९२५
ई-मेल: investorrelations@mahanagargas.com • संकेतस्थळ: www.mahanagargas.com

MAHANAGAR GAS

**मार्च ३१, २०१७ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि वर्षाकरिता वित्तीय निष्कर्षाचा ताळेबंद**

(₹ कोटींमध्ये)

| अ. क्र. | तपशील | संपलेल्या तीन महिन्यांसाठी (अलेखापरीक्षित) | | | संपलेल्या वर्षासाठी (लेखापरीक्षित) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मार्च १७ | डिसें. १६ | मार्च १६ | मार्च १७ | मार्च १६ |
| १. | प्रवर्तनातून एकूण उत्पन्न | ५८९.३६ | ५६६.७४ | ५७५.९६ | २,२९१.७३ | २,३३२.३१ |
| २. | कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा# | १५०.४७ | १५४.३६ | १२७.६८ | ६००.६५ | ४७१.६३ |
| ३. | कालावधीसाठी करपश्चात निव्वळ नफा# | ९९.४७ | ९९.०० | ८४.३९ | ३९३.४२ | ३१०.८९ |
| ४. | कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न | १०१.०६ | ९९.१९ | ८५.७४ | ३९२.७६ | ३१२.५८ |
| ५. | समभागभांडवल | ९८.७८ | ९८.७८ | ८९.३४ | ९८.७८ | ८९.३४ |
| ६. | पुनर्मूल्यांकित राखीववगळता इतर समभाग | - | - | - | १,७४१.२६ | १,६३९.०९ |
| ७. | प्रति भाग उत्पन्न (दर्शनी मूल्य ₹ १०/- प्रत्येकी) | | | | | |
| | मूळ (₹)* | १०.०७ | १०.०२ | ८.५४ | ३९.८३ | ३१.४७ |
| | सौम्यीकृत (₹)* | १०.०७ | १०.०२ | ८.५४ | ३९.८३ | ३१.४७ |

* मूळ आणि सौम्यीकृत ईपीएस यांचे अंतरिम कालावधीसाठी वर्गीकरण केलेले नाही.
# सादर केलेल्या कालावधीदरम्यान अपवादात्मक/अतिविशिष्ट बाबींचा समावेश केलेला नाही.

**टिपा :**
ए) उपरोक्त वित्तीय निष्कर्षांचे लेखा समितीद्वारे पुनर्निरीक्षण करण्यात आले आहे. कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे मे २६, २०१७ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीमध्ये संमत करण्यात आला आणि संवैधानिक लेखापरीक्षण समितीद्वारे लेखापरीक्षण करण्यात आले आहे.
बी) सेबी (लिस्टिंग ॲण्ड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) नियमावली २०१५ च्या नियम ३३च्या अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजमध्ये सादर केलेल्या संपलेल्या त्रैमासिक/ वर्षाकरिताचा उपरोक्त हा तपशीलवार आराखडा आहे. संपलेल्या त्रैमासिक/ वर्षाकरिताच्या वित्तीय निष्कर्षाचा संपूर्ण आराखडा स्टॉक एक्स्चेंज (**www.bseindia.com** आणि **www.nseindia.com**) या संकेतस्थळांवर आणि कंपनीच्या (**www.mahanagargas.com**) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
सी) कंपनीने एप्रिल १, २०१६ पासून इंडियन अकाऊन्टिंग स्टॅण्डर्ड्स (''इंड एएस'') ही पद्धती स्वीकारली आहे. सदर स्वीकृती इंड-एएस १०१ चा वापर पहिल्यांदा इंडियन अकाऊन्टिंग स्टॅण्डर्डचा वापर करताना घेण्यात आले आहे. सर्वसाधारणपणे कंपनी कायदा २०१३च्या कलम १३३सह वाचल्या जाणाऱ्या संबंधित नियमांच्या नुसार सर्वसाधारणपणे स्वीकारल्या गेलेल्या इंडियन अकाऊन्टिंग प्रिन्सिपल्सनुसार व्यवहार करण्यात आला आहे. याचा परिणाम एप्रिल १, २०१५च्या सुरुवातीच्या राखीवमध्ये दाखविण्यात आला आहे आणि त्यानुसार कालावधीसाठी त्यानुसार पुनर्गठित करून सादर करण्यात आले आहे.
डी) कंपनीने इनिशियल पब्लिक ऑफर (आयपीओ)ची भागधारकांना विक्रीद्वारे करण्यात आलेले आहे. (प्रस्ताव) कंपनीचे समभाग जुलै १, २०१६ मध्ये स्टॉक एक्स्चेंज (एनएसई व बीएसई) मध्ये सूचिबद्ध करण्यात आलेले आहेत.
ई) गत वर्षीच्या उर्वरित आकडे लेखापरीक्षित आकडे यांच्या संदर्भात पूर्ण वित्तीय वर्ष आणि वर्ष ते वर्षच्या चालू वित्तीय वर्षाच्या तिसऱ्या त्रैमासिकामध्ये घेण्यात आले आहेत.
एफ) संचालक मंडळाने मे २६, २०१७ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीमध्ये प्रत्येकी ₹ १०/- दर्शनी मूल्याच्या समभागांवर ₹ ११/- लाभांश हा मार्च ३१, २०१७ रोजी संपलेल्या वर्षासाठी जाहीर केला आहे. हा या वर्षी देण्यात येणाऱ्या ₹ ८च्या अंतरिम लाभांशाचे प्रदान करण्यात येईल. एकूण ₹ १९/- चा लाभांश प्रति समभाग (साधारण लाभांश ₹ १२.५० आणि विशेष लाभांश ₹ ६.५०/-) दर्शनी मूल्य ₹ १०/-च्या वर देण्यात येईल. सदर प्रस्ताव हा भागधारकांच्या होणाऱ्या सर्वसाधारण वार्षिक सभेमधील मान्यतेवर आधारित आहे आणि जर मान्य झाले तर ₹ १२८.४८ कोटींवर कॉर्पोरेट लाभांश कराचा कॅश आऊटफ्लो होईल.

**संचालक मंडळाकरिता आणि त्यांच्या वतीने**
सही/-
**राजीव माथुर**
*व्यवस्थापकीय संचालक*
*डीआयएन क्र. : ०३३०८१८५*

**ठिकाण :** मुंबई
**दिनांक :** मे २६, २०१७